■ बीड (महाराष्ट्र) ■ सायं.दैनिक ■ मराठी ■ वर्ष – ०२ ■ अंक – २५५ ■ मंगळवार दि.३ जून २०२५ ■ आरएनआय – एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ ■ किंमत ३ रू. । पाने ४

■ Beed (Maharashtra) ■ Daily Evening ■ Marathi ■ Year - 02 ■ Issue - 255 ■ Tuesday Dt.3 June 2025 ■ RNI : MAHMAR/2023/83965 ■ Price - 3 Rupees ■ Pages 4

# मजुरीसाठी मातृत्वाचा बळी? बीड जिल्ह्यात महिलांचा मूक आक्रोश, ८४३ महिलांनी काढून टाकले गर्भाशय?





अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
आरंभ
संपादक : दिपक थोरात Mob.9860898564

# डॉक्टर बांधवांनो, स्वत:च्या फायद्यासाठी लोकांचा बळी घेऊ नका, हे पाप अजन्म फिटणार नाही!

## निष्क्रिय डॉक्टरांच्या सल्ल्याने महिलांची प्रकृती चिंताजनक; ऊस तोडणीसाठी गेलेल्या महिला मरणाच्या दारात?

■ गर्भपिशव्या काढल्याची धक्कादायक बाब समोर; ३० ते ३५ वयोगटातील महिलांचा समावेश

■ महिलांच्या विश्रांतीची गदा, भविष्यासाठी परिणामकारक ठरलीय

■ जनतेने दिलेली देवाची उपाधी डॉक्टरांच्या नाकरतेमुळे नालायक अशी उपाधी द्यावी लागेल

बीड । प्रतिनिधी

मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येनंतर बीड जिल्हा वेगवेगळ्या कारणांमुळे चर्चेत असतो. मात्र आता ऊसतोड कामगारांचा जिल्हा म्हणून ओळखला जाणारा बीड जिल्हा एका धक्कादायक कारणासाठी चर्चेत आला आहे. प्रत्येक वर्षी बीड जिल्ह्यातून जवळपास दीड लाखांहून अधिक ऊसतोड मजुरांचे स्थलांतर होते. या वर्षी स्थलांतरादरम्यान तब्बल ८४३ ऊसतोड महिला कामगाराच्या गर्भपिशव्या काढल्याची धक्कादायक बाब समोर येत आहेत. ज्यात ३० ते ३५ वयोगटातील तब्बल ८४३ महिलांचे गर्भाशिय काढण्यात आले आहेत. त्यामुळे जिल्ह्यात खळबळ माजली आहे. या महिलांना ऐन



तारुण्यात मरणयातना सहन कराव्या लागत आहेत. गेल्या अनेक वर्षांपासून ऊसतोड महिलांचे गर्भाशय काढण्याचे प्रकार समोर येत आहेत. दरम्यान सरकारने या महिलांना मानधन देण्याची मागणी ऊसतोड कामगार संघटनेने केली आहे.

बीड जिल्हा ऊसतोड कामगारांचा जिल्हा म्हणून ओळखला जातो. दरवर्षी या जिल्ह्यातून दीड लाखाहून अधिक ऊसतोड मजुरांचं राज्याच्या इतर भागात स्थालांतर होतं. ऊस तोडणी हंगाम सुरू झाल्यानंतर मजूर दिवाळी दरम्यान महाराष्ट्रासह परराज्यात ऊस तोडणीसाठी जातात. सहा महिने ऊस तोडणी करून मार्च महिन्यापर्यंत त्यांचा परतीचा प्रवास असतो. आरोग्य विभागाकडून ऊस तोडणीला जाण्यापूर्वी आणि परत आल्यावर त्यांची आरोग्य तपासणी केली

▶ पान २ वर

### गर्भवती असूनही फडावर हजेरी

१५२३ गर्भवती महिला ऊस फडावर काम करत असल्याचंही या अहवालातून समोर आलं आहे. याचा अर्थ गर्भधारणेच्या काळात त्या कोणत्याही आरोग्य सुविधा न घेता उन्हातान्हात शारीरिक श्रम करत आहेत. यामुळे आई व बाळ दोघांच्या आरोग्याला गंभीर धोका संभवतो.

### शस्त्रक्रियेची एक अपरिहार्यता की आर्थिक विवंचनेचा टोकाचा निर्णय?

उघडकीस आलेल्या आकडेवारीनुसार, ३० ते ३५ वयोगटातील ४७७ महिलांवर गर्भाशय काढण्याची शस्त्रक्रिया झाली आहे. यामागे मासिक पाळीत होणारे अत्याधिक रक्तस्राव, अंगावरून जाणे, वारंवार जंतुसंसर्ग, पोटदुखी अशा वैद्यकीय कारणांचा हवाला दिला जातो. मात्र, यामागे दडलेला खरा मुद्दा आहे काम न मिळण्याची भीती आणि मजुरीवर होणारा परिणाम. कारण गर्भवती असल्यास किंवा मासिक पाळीमुळे विश्रांती घेतल्यास महिलांना मजुरीवर गदा येते. त्यामुळे अनेक महिला शरीरावर परिणाम होऊनही कामासाठी सज्ज राहण्याचा 'दिवसेंदिवस हाणणारा' निर्णय घेतात.

## कडा बसस्थानकातील स्वच्छतागृह परिसराला घाणीचा विळखा!

### आगार प्रमुखाचे दुर्लक्ष; दुर्गंधीने प्रवाशी वैतागले

दौलावडगाव । प्रतिनिधी

येथील बसस्थानकातील स्वच्छतागृह परिसरात मागील अनेक दिवसांपासून घाणीचे साम्राज्य निर्माण झाल्याने प्रवासासह, इतर दुकानदारांना दुर्गंधीचा सामना करावा लागत आहे. तर महिलांची येथे मोठ्या प्रमाणावर कुचंबणा होत असताना देखील आगार प्रमुखाचे याकडे दुर्लक्ष आहे. तात्काळ याठिकणच्या दुर्गधीचा बंदोबस्त करावा अशी मागणी केली जात आहे.

▶ पान २ वर



## परळीत शेतकऱ्याने केली आत्महत्या

परळी वैजनाथ । प्रतिनिधी

परळी तालुक्यातील खामगाव येथे एका शेतकऱ्याने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची हृदयद्रावक घटना आज (दि. ३) सकाळी उघडकीस आली. प्रल्हाद अंकुश बडे (वय ४०) असे आत्महत्या केलेल्या शेतकऱ्याचे नाव आहे. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत असून, शेतकरी आत्महत्यांचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

मागील काही वर्षांपासून त्यांना सततच्या नापिकी, वाढता उत्पादन खर्च आणि कर्जाचा डोंगर यामुळे आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत होता. कुटुंबाचा उदरनिर्वाह कसा करावा, या चिंतेत ते नेहमीच असत असे त्यांच्या कुटुंबीयांनी सांगितले. याच विवंचनेतून त्यांनी हे टोकाचे पाऊल उचलल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त केला जात आहे. या घटनेची माहिती मिळताच सिरसाळा पोलिस ठाण्याचे कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले आहेत. पोलिसांनी पंचनामा करून मृतदेह प्राथमिक आरोग्य केंद्र सिरसाळा येथे शवविच्छेदनासाठी पाठवला आहे. दरम्यान प्राथमिक माहितीनुसार ही आत्महत्या अर्थिक विवंचनेतून झाली असल्याचे बोलले जात आहे मात्र आत्महत्येचे कारण अधिक तपासानंतर स्पष्ट होणार आहे.

## वारणी गावात आठ हजार स्केअर फूटांत उभारले जातेय गोपीनाथ मुंडेंचे स्मारक!

### राजस्थानहून ६ फूट उंच पूर्णाकृती पुतळा मागवला

बीड । प्रतिनिधी

वारणी गावात दिवंगत लोकनेते गोपीनाथ मुंडे यांचे ८ हजार स्केअर फूट जागेत २५ लाख रुपये खर्चुन स्मारक उभारले जात आहे. या स्मारकात ६ फुटांचा पुतळा उभारला जाणार असून तो राजस्थानहून तयार करून मागवला गेला आहे. येत्या दोन महिन्यांत हे काम पूर्ण होऊन त्यांचे लोकार्पण केले जात आहे.



आज ३ जून हा दिवंगत नेते गोपीनाथराव मुंडे यांचा स्मृतिदिन. शिरूर कासार तालुका गोपीनाथ मुंडे यांचा बालेकिल्ला समजला जात होता. जसे स्व. मुंडे यांचे तालुक्यावर प्रेम होते, तसे तालुक्यातील नागरिकांचेदेखील त्यांच्यावर अतोनात प्रेम होते. तालुक्यातील वारणी हे गाव गोपीनाथ मुंडे यांना मोठ्या प्रमाणावर मानणारे गाव म्हणून ओळखले जाते. गावच्या सरपंच प्रियंका अविनाश केदार यांच्या पुढाकारातून या गावात गोपीनाथराव मुंडेंच्या स्मरणार्थ आठ हजार स्केअर फूट जागेवर २५ लाख रुपये खर्चुन स्मारक स्वखर्चातून उभारले जात आहे. तालुक्यातील हे त्यांचे सर्वात मोठे स्मारक आहे. या स्मारकासाठी सहा फूट उंचीचा पुतळा राजस्थानमध्ये निर्माण करण्यात आला आहे. यासाठी ६ महिन्यांचा कालावधी कारागिराला लागलेला आहे. या स्मारकाचे लोकार्पण पुढील दोन महिन्यांत होईल. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आदींच्या उपस्थितीत हा सोहळा होईल.

### तालुका निर्मितीचे श्रेय

शिरूर तालुका निर्मितीला व विकासामध्ये गोपीनाथराव मुंडे यांचे मोठे योगदान राहिलेले आहे. गोपीनाथ मुंडे यांच्या प्रेमाचे व निष्ठेचे प्रतीक म्हणून वारणीत स्वखर्चातून स्व. गोपीनाथ मुंडे यांचे स्मारक उभारण्याचा ध्यास पूर्णत्वास जात आहे.

– प्रियंका केदार, सरपंच

## स्वच्छ शहर; सुंदर शहर नावालाच?

### मान्सून पूर्व कामे रखडली, अवकाळी पावसाने पालिकेच्या कारभाराचा बुरखा फाटला

धारूर । प्रतिनिधी

धारूर शहरातील मान्सूनपूर्व कामांना वेळेत पूर्ण करण्याच्या दृष्टीकोनातून पालिका प्रशासनाने वेळीच नियोजन करून आवश्यक तेवढे काम वेळेत पूर्ण करणे आवश्यक आहे. यात रस्त्यांवरील खड्डे बुजवणे, नाले स्वच्छ करणे, झाडांची फांद्या छाटणे, रस्त्यावर गटाराचे पाणी येऊ नये यासाठी आवश्यक त्या ठिकाणी सुधारणा वेळेत पूर्ण करणे आवश्यक असून या कडे कसलेही नगरपरिषदेचे लक्ष नसल्यामुळे सर्वत्र घाणीचे साम्राज्य पसरले आहे.

नुकत्याच झालेल्या मागण्या काहीदिवसा पूर्वी अवकाळी पावसाने नाल्या तुडुंब भरून घाण पाणी वाहत शहरातल्या रस्त्यावर येत असून



अनेक आजार होण्याचे ही लक्षणे दिसत आहेत. काही दिवसापूर्वी दिलेल्या हवामान खात्याने त्यांच्या अंदाजा नुसार २७ मे रोजी पासून मान्सून केरळमध्ये दाखल होणार असल्याचं सांगितलं होते.

शहरातील मान्सूनपूर्व कामांचे योग्य नियोजन करून सर्व संबंधित यंत्रणांनी एकमेकांशी समन्वय ठेवत. नाल्यांची साफसफाई, गटारी स्वच्छ करणे जेणेकरून पाण्याचा योग्य निचरा होईल रस्त्यांवरील खड्डे बुजवणे इतर आवश्यक दुरुस्त्या केल्यास ऐनवेळी यंत्रणांचे धावपळ होणार नाही व नागरिकांची गैरसोय टाळले जाऊ शकते रस्त्यांवर विद्युत तारांना धोकादायक असणाऱ्या झाडांच्या फांद्यांची छाटणी, पावसाच्या पाण्याचा निचरा चांगला होईल यासाठी आवश्यक उपायोजना करणे गरजेचे आहे.

शहरात सुरू असलेल्या जलवाहिनीच्या कामामुळे शहरातील रस्ते खोदले जात आहेत. मागच्या काही दिवसापूर्वी पडलेल्या

▶ पान २ वर

# गायरान जमीनीवर सधन लोकांचं अतिक्रण भुमिहिन गोरगरीबांना नो एन्ट्री

## जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार अर्ज दाखल

बीड । प्रतिनिधी

तालुक्यातील लोणीघाट येथील गट नं.१११ वरील गायरान जमीनीवर भुमिहिन किंवा सर्वसामान्य कुटुंब ज्यांना गावात घर बांधायला जागा नाही अशा लोकांपेक्षा सधन लोकांनी गायरान जमिनीवर अतिक्रमण करत मुस्लिम कब्रस्तान आणि देवस्थानच्या नगारखाना, जिल्हा परिषद शाळा, हायस्कूल तर प्राथमिक आरोग्य केद्राला सुध्दा विळखा घातला आहे.

गायरान जमिनीवर कोणी बंगले तर कोणी पाच एकरच्या आसपास जमीन बळकावत उद्योग व्यवसाय उभारले असल्याने रामचंद्र विनायकराव जाधव, रावसाहेब जनार्दन जाधव, पत्रकार मुस्तफा बाबनखॉं पठाण यांच्या सह ८४ गावकऱ्यांनी स्वाक्षऱ्या करुन अतिक्रमण विरोधी जनआंदोलन करण्याचा निर्धार करत जिल्हाधिकारी व तहसिल यांना तक्रार अर्ज दाखल केला आहे.

काही लोकांनी बंगल्यासमोरची तर काही लोकांनी आपल्या शेतीच्या बाजुची गायरान जमीन वहीतीकरत तर काहिंनी गायरान जमिनीवर अतिक्रमण करून कोट्यावधी रुपयांच्या आसपास बंगले उभे केले आहेत तर काहिंनी गाळ टाकुंन जमिन शासनाची असुन आपल्याच मालकी हक्काची असल्याचे दर्शवले आहे. या प्रकरणी चंद्रकांत विनायकराव



जाधव, रावसाहेब जनार्दन जाधव, पत्रकार मुस्तफा बाबनखॉं पठाण यांच्या सोबत ८४ गावकऱ्यांनी सह्या करून अतिक्रमण विरोधी एकत्र येऊन जिल्हाधिकारी व तहसीलदारांकडे तक्रार अर्ज दाखल केले आहेत. गावकऱ्यांनी तक्रार अर्जात म्हटले आहे की, आमच्या गावाला एकुण १६५ एकर गायरान जमीन होती, परंतु त्यामधील १०० एकर म्हणजेच ४० हेक्टर जमीन ही शासनाने वनीकरण विभागाला झाडे लावण्यासाठी दिली.

परंतु सदर वनीकरणाच्या जमीनीवर व इतर उर्वरीत जमीनीवर गावातील काही लोकांनी अतिक्रमण करुन त्या जमीनीमध्ये शेती करणे, उद्योगधंदे टाकणे, तसेच गायरान जमीनीमध्ये पक्के आर.सी.सी. बांधकाम करुन अतिक्रमण केले आहे व गायी म्हशीच्या चाऱ्यावर गडांतर आणले आहे. तसेच गावातील मुस्लीम समाजाच्या कब्रस्तानला सुध्दा चोहोबाजुने अतिक्रमण केलेले आहे व जि.प.प्रा.शाळा लोणीघाट व हायस्कुल लोणीघाट ला सुध्दा अतिक्रमणाचा विळखा पडला आहे.

सदर गायरान जमीनीवर गावातील बागायतदार, ग्रामपंचायत सदस्य, ग्रामपंचायत मधील कर्मचारी, सरकारी नोकरदार व जमीनदार लोकांनी अतिक्रमण केलेले असून एकाही दिन दलीत, मुस्लीम, बारा बलुतेदार यांनी अतिक्रमण केलेले नाही. लोणीघाट येथील गायरान जमीनी या गावातीलच काही लोकांनी अतिक्रमण करुन ताब्यात घेतल्या असून सदर गायरान जमीनीत अधि अतिक्रमण करून पुन्हा दुसऱ्याला बिनबोभाट खरेदी विक्रीचे व्यवहार सुध्दा केले आहेत.

काही लोकांनी सदर जमीनीवर बेकायदेशीररित्या मोठमोठे उद्योगधंदे सुरु केले आहेत. त्यांना कोणी विचारले तर, तुमच्या बापाची जमीन आहे का?, आम्ही काहीही करु शकतो, तुम्हाला काय करायचे ते करा, सरकार आणि आम्ही बघु, अशी मग्रुरीची भाषा वापरून दमदाटी करतात. जिल्हाधिकारी यांनी लोणीघाट येथील गट नं.१११ मधील अतिक्रमण तात्काळ काढावे व संबंधीतावर योग्य ती कार्यवाही करावी, अशी मागणी तक्रार अर्जावर करण्यात आली आहे.

### अतिक्रमण धारकांचा रस्ते व पावसाच्या पाण्यावर नेहमी होतो वाद

गायरान जमिनीवर अतिक्रमण करताना सर्वांनीच रोडच्या कडेला जागा धरुन भविष्यात रोडलगत बिल्डिंग बांधण्याचे स्वप्न पुर्णत्वास नेहले आहे तर काहिंनी उद्योग धंद्यासाठी आपली शेती ते रोडपर्यंत आपलाच हक्क अबाधित ठेवला आहे. या यांच्या रोडलगत बिल्डिंग बांधण्याचे व उद्योग धंद्यासाठी धरलेल्या जागेमुळे रोडच्या दोन्ही कडेला असणाऱ्या पाण्याच्याचाऱ्या भुईसपाट झाल्या आहेतच वरून ज्यांनी यांच्या पाठिमागे जागा धरलेली आहे. त्यांचे पाणि व रस्ता आडवला असल्याने प्रत्येक दोन तिन दिवसाला गायरान जमिनीवरील अतिक्रमण धारकांचे वाद पेटतात आणि मंग तो वाद पोलिस स्टेशन पर्यंत गेला कि गावातील त्यांचे पाठिराखे पुढारी तो वाद मिटवतात. वाद मिटवताना असं म्हटलं जातं कि तुम्ही एकमेकांवर केसेस केल्या तर संपूर्ण अतिक्रमण शासन काडेल मंग वाद आपोआप मिटतो परंतु वाद हे नेहमीच होतात हे ठरलेलं आहे.



## लोकशाही पत्रकार संघ महाराष्ट्र राज्य तर्फे गुणवंत विद्यार्थींनी चा सत्कार

रत्नागिरी । प्रतिनिधी

लोकशाही पत्रकार संघ महाराष्ट्र राज्य तर्फे रत्नागिरी चे जिल्हा उपाध्यक्ष फरहान होडेकर यांज कडून न्यू इरा इंग्लिश मिडियम शाळेची विद्यार्थी नी महेक जांभारकर हीचा लोकशाही पत्रकार संघ महाराष्ट्र राज्य रत्नागिरी कडून विशेष सत्कार करण्यात आला.

महेक जांभारकर ही न्यू इरा इंग्लिश मिडियम सैतवडे शाळेची हुशार विद्यार्थी नी आहे. महेक जांभारकर हीने इयत्ता दहावी शालांत परीक्षेत शाळेत ८३.४० टक्के गुण घेउन प्रथम क्रमांक घेउन उतीर्ण झाली. याची फरहान होडेकर यांजकडून दखल घेउन विशेष सत्कार करण्यात आला. या वेळी लोकशाही पत्रकार संघ महाराष्ट्र राज्य रत्नागिरी चे उपाध्यक्ष फरहान होडेकर, तसेच विद्यार्थी नी चे आई, वडील उपस्थित होते.

## आज जागतिक सायकल दिन

बीड । प्रतिनिधी



जगभरात ३ जुन हा दिवस जागतिक सायकल दिवस म्हणून साजरा केला जातो. आपले बालपण, शालेय जीवन आणि आनंददायी जीवन जगण्यात सायकलचा खुप मोठा वाटा होता. सायकल म्हणजे एक अप्रूप असायचं प्रत्येकासाठीच! प्रत्येकाच्याच कितीतरी सुख-दु: खाच्या आठवणी आहेत या सायकल सोबत.

आज जागतिक सायकल दिन! दरवर्षी ३ जून रोजी साजरा केला जातो. हा दिवस सायकलिंगच्या फायद्यांबद्दल जागरूकता वाढवण्यासाठी आणि लोकांना सायकलचा वापर करून शाश्वत जीवन जगण्यास प्रोत्साहन देण्यासाठी साजरा केला जातो. सायकल एक स्वच्छ, परवडणारी आणि पर्यावरणास अनुकूल वाहतुकीचे साधन आहे. सायकलिंग शारीरिक आणि मानसिक आरोग्यासाठी खूप फायदेशीर आहे असे सामाजिक कार्यकर्ते बाजीराव ढाकणे यांनी सांगितले

हे जरी खरं असलं तरी आपल्या लहानपणाला समृद्ध करणारी सायकल ही आनंदाचा ठेवाच होता. आता देखील जेव्हा कधी व्यस्ततेतून वेळ मिळेल तेव्हा सायकलिंग करतोच. मनाला तीच प्रसन्नता व आनंद लाभतो. 'जुनं ते सोनं' सांगणारी सायकल आजही सर्वांना हवीहवीशी वाटते. आपणा सर्व सायकल प्रेमींना जागतिक सायकल दिनाच्या हार्दिक हार्दिक शुभेच्छा!

## खिळद येथे स्वर्गीय गोपीनाथ मुंडे यांची पुण्यतिथी साजरी

दौलावडगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील खिळद येथे स्वर्गीय गोपीनाथ मुंडे यांच्या पुण्यतिथी निमित्त प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करत पुण्यतिथि साजरी करण्यात आली.

यावेळी श्रीराम गर्जे, गर्जे, कृष्णा गर्जे, उध्दव गर्जे, संदीप गर्जे, अशोक गोल्हार, पांडुरंग गर्जे, देवीदास गर्जे, भाऊसाहेब गर्जे, सुखदेव आघाव, नानाभाऊ गर्जे, सुखदेव वनवे,बाळासाहेब गर्जे, याच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.





बीड - येथील ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड यांनी स्थानिक गुन्हे शाखेच्या प्रमुख पदाचा पदभार स्वीकारला या अनुषंगाने त्यांचा महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने सत्कार करून शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी मनसेचे जिल्हा उपाध्यक्ष सदाशिव अण्णा बिडवे, बीड शहराध्यक्ष अमर जान पठाण, शहर सचिव कार्तिक जव्हेरी, शहर उपाध्यक्ष आकाश टाकळकर सह आदी उपस्थित होते.

पान १ वरून...

### डॉक्टर बांधवांनो, स्वत:च्या फायद्यासाठी लोकांचा

जाते. मात्र याच स्थलांतरा दरम्यान ८४३ ऊसतोड महिला कामगाराचे गर्भाशय काढल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. धक्कादायक म्हणजे यात ३० ते ३५ वयोगटातील महिलाचा अधिक समावेश आहे. गर्भाशय काढल्यानंतर काढल्यानंतर अनेक या महिलांना आरोग्य समस्यांना तोंड द्यावं लागत आहे. मासिक पाळीत रक्तस्त्राव होणे, जंतुसंसर्ग, पोटात दुखणे अशा गंभीर समस्यांना तोंड द्यावं लागत होतं. त्यामुळे गर्भाशय काढण्याचा सल्ला डॉक्टरांनी दिला होता. मात्र गर्भाशय काढल्यानंतर मात्र असंख्य आरोग्य समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. तर ज्या महिला कुटुंबाचा उदरनिर्वाह चालविण्यासाठी ऊस तोडणी करतात, त्या महिलांना दहा ते पंधरा वर्षांपूर्वी गर्भाशय काढले आहेत, त्यांना आता मरण यातना सहन कराव्या लागत असल्याचं स्वत: महिलांनी सांगितलं.

### कडा बसस्थानकातील स्वच्छतागृह परिसराला घाणीचा विळखा!

मराठवाडयाचे प्रवेश द्वार समजले जाणाऱ्या आणि अहिल्यानगर बीड राष्ट्रीय महामार्गावर असलेल्या आष्टी तालुक्यातील कडाबसस्थानकात महिला, पुरुषांसाठी स्वच्छतागृहाची सोय काही महिन्यापुर्वी करण्यात आली आहे. स्वच्छतागृह परिसरात घाणीचे साम्राज निर्माण झाल्याने महिलाची मोठी कुचबंना होत आहे. तर या घाणीमुळे परिसरात दुर्गंधी वाढली आहे.याकडे आगार प्रमुखानी लक्ष देऊन त्वरित उपाययोजना कराव्यात, अशी मागणी केली जात आहे.

### स्वच्छ शहर; सुंदर शहर नावालाच?

अवकाळी पावसामुळे खोदलेल्या रस्त्यांवर चिखलाचा सडा साचलेला आहे तर वाहनेही जात नसून रोड असून नसल्यासारखा खोळंबा झाला आहे. यात रस्त्यांचे कॉंक्रिटीकरण वेळेत पूर्ण न झाल्यास मान्सून हंगामात शहरात सर्वत्र घाणीचे साम्राज्य पसरण्याचा धोका आहे त्यामुळे शहरात मोठ्या प्रमाणावर रोगराई निर्माण होऊ शकते डेंगू सदृश्य आजारांना आळा घालण्यासाठी मानसून पूर्व स्वच्छतेची कामे दर्जेदार व वेळेत पूर्ण करण्याची मोठे आव्हान धारूर नगरपालिका प्रशासनासमोर आहे मान्सून पूर्व कामे गतीने पूर्ण करण्याची मागणी शहरातील नागरिकांकडून केली जात आहे.

**धारूर शहरातील मूलभूत सुविधांचा बोजवारा**

मागील तीन वर्षांपासून शहरात प्रशासकराज सुरू आहे. या कार्यकाळात पायाभूत व मूलभूत सुविधा निर्माण करण्यावर कोट्यवधी रुपयांच्या कामांना प्रशासकीय मान्यता देत निधी खर्च केला.पण, शहरातील मूलभूत सुविधांकडे दुर्लक्ष झाल्याने सामान्य नागरिकांना विविध समस्यांचा सामना करावा लागत आहे. घंटागाड्या फिरतात मात्र गल्लीबोळात घाणीचे ढीग जमा झाले आहेत. तुंडूब भरलेल्या नाल्या व गटारांचे पाणी रस्त्यांवर आल्याने रोगराई पसरतेय, नळाला पंधरा पंधरा दिवस पाणी नाही. रस्त्यांची प्रचंड दुरवस्था या सर्व समस्यांकडे नगरपरिषद प्रशासनाचे पूर्णपणे दुर्लक्ष झाले आहे. शहरातील नागरिकांना दर्जेदार मूलभूत सुविधा देण्याची मागणी नागरिकांमधून होत आहे.

# मुलांना संस्कारक्षम विचारांची शिदोरी देणारा कवयित्री महेमूदा शेख यांचा बालकाव्यसंग्रह गुलपरी

लहान मुलांच्या सानिध्यात आलेल्या लेखक आणि कवीला बाल कविता लिहिण्याचा मोह आवरता येत नाही. गझल, कविता आणि गायन विश्वात कमी कालावधीत लौकिक मिळवलेल्या कवयित्री महेमूदा रसूल शेख यांचे 'गुलपरी' बालकाव्यसंग्रह, 'लाजवंती' आणि 'काव्यलतिका' असे एकूण तीन काव्यसंग्रह प्रकाशित आहेत.'गुलपरी' या काव्यसंग्रहाबद्दल बोलायचे झाल्यास, या काव्यसंग्रहाचे नाव कवयित्री महेमूदा यांनी आपल्या वडिलांच्या नावावरून दिले आहे. त्यांचे वडील 'गुलाबराव' यातील 'गुल' आणि त्यांच्या परीसमान असलेल्या महेमूदाजी यांच्यावरून 'गुलपरी' असे नाव देण्यात आले आहे. हे नाव लहान मुलांच्या मनाला भुरळ घालणारे आहे, तसेच या काव्यसंग्रहातील कविता देखील तशाच मनमोहक आहेत.काव्यसंग्रहाचे मुखपृष्ठ अत्यंत रेखीव आहे. एल. पी. क्रीशन यांनी साकारलेल्या चित्रात ढगातून पडणारा पाऊस आणि मित्र-मैत्रिणी छत्री घेऊन चालत असल्याचे दृश्य अत्यंत सुंदरपणे टिपले आहे. 'ललित कला साहित्य मंच'चे राष्ट्रीय अध्यक्ष ललित कोलते यांनी अभ्यासपूर्ण आणि मुद्देसूद प्रस्तावना लिहिली आहे. ललितजी म्हणतात, 'गुलपरी' या काव्यसंग्रहातील कविता मुलांसाठी अतिशय चांगल्या आणि संस्कारक्षम आहेत. तसेच, पुस्तकाच्या मलपृष्ठावर महेमूदाजींचा साहित्यिक प्रवास नमूद केला आहे.

बालकाव्य लिहिणे ही एक तारेवरची कसरत असते. ही कसरत करताना साहित्यिकाला लहान मुलांबरोबर लहान व्हावे लागते. मुलांच्या आवडी-निवडी लक्षात घेऊन, त्यांना मनोरंजनासोबत संस्कारही मिळावेत याचा विचार करावा लागतो. कवयित्री महेमूदा जी यांनी या सगळ्याचा विचार करून बालकविता रचल्या आणि त्या कसोटीवर खऱ्या उतरल्या आहेत.मुलांना मनोरंजनासोबतच खऱ्या-खोट्यांचे, नैतिकतेचे, आरोग्याचे आणि भावनिक जाणीवेचे शिक्षण मिळावे, यासाठी कवयित्री महेमूदा जींनी आपल्या कवितांद्वारे आपले योगदान दिले आहे. त्यामुळे त्या एक सक्षम बालसाहित्यिका ठरल्या आहेत. या काव्यसंग्रहात एकूण ७५ कविता आहेत. या कविता लहान मुलांना आवडणाऱ्या ठरतीलच, पण त्यासोबत प्रौढांच्या मनालाही भावतील.या काव्यसंग्रहास अनेक मान्यवरांचे शुभेच्छा संदेश मिळाले आहेत, जे या काव्यसंग्रहाची प्रतिष्ठा अधिक उंचावतात.

गुलपरी या काव्यसंग्रहातील पहिलीच कविता मनाला भावणारी आहे. बाबा हे प्रत्येकाच्या आयुष्यात विशेष स्थान राखतात. त्यांच्या रागाची झलक सर्वांना सहज दिसते, पण त्यांचे प्रेम आणि अंत:करणातील वेदना फारच कमी लेखकांनी शब्दबद्ध केल्या आहेत. कवयित्री महेमूदा शेख यांनी हे वास्तव जाणून, बाबांचे चित्रण आपल्या कवितेत प्रभावीपणे साकारले आहे.बाबांविषयी लिहिताना कवयित्री महेमूदा शेख म्हणतात-

**बाबा म्हणजे काय**
**सांगेल का हो कोणी**
**डोक्यावर वाहतो जो**
**सगळ्या दु:खाची गोणी**

बाबा जे कष्ट करतात, घराचा गाडा सांभाळतात, सर्वांच्या इच्छा पूर्ण करण्यासाठी अहोरात्र झटतात-या त्यांच्या समर्पणाचे सुंदर चित्रण कवयित्री महेमूदा शेख यांनी आपल्या कवितेत रेखाटले आहे. ही कविता वाचताना प्रत्येकाला त्यांच्या बाबांची आठवण निश्चितच येईल!कवयित्री महेमूदाजींच्या कविता केवळ मुलांचे मनोरंजन करत नाहीत, तर त्यांच्यात नात्यांच्या गोडव्याची आणि भावनांच्या संवेदनशीलतेची बीजं रोवतात. आई बाबांचे प्रेम, आईची इच्छा, नातं बहीण भावाचं, आणि प्रिय बाबाअशा कवितांमधून मुलांना प्रेम, आपुलकी, नात्यांचे महत्त्व आणि त्यातील हळुवारपणा समजावून देण्याचा सुंदर प्रयत्न केला आहे. त्यांच्या नदी म्हणे आणि पालखी प्रेमाची या कवितांमधून निसर्गाच्या सौंदर्याबरोबर जीवनाच्या प्रवाहाचे आणि संस्कृतीच्या वारसाचे अनोखे दर्शन घडते. बालपणही कविता तर लहानपणीच्या निरागस




आठवणींना पुन्हा जागवत, प्रत्येक वाचकाला हसवते आणि भावूकही करते.अशा सर्व कविता लहानग्यांच्या भावविश्वात आपले स्थान निर्माण करून, त्यांना नात्यांचे आणि जीवनाचे मूल्य शिकवतात. त्यामुळे हा काव्यसंग्रह फक्त वाचनाचा आनंदच देत नाही तर मुलांना संस्कारक्षम विचारांची शिदोरीही देतो.

कवयित्री महेमूदा शेख यांच्या या कवितांमधून मुलांच्या शाळेशी असलेल्या भावनिक नात्याचा अत्यंत संवेदनशील आणि सुंदर असा वेध घेतलेला दिसतो. शाळा आणि शाळेचा पहिला दिवस या कवितांमध्ये शाळेच्या गोड आठवणी, शिकण्याचा आनंद आणि मित्र-मैत्रिणींच्या सहवासातील उत्साहाचे चित्रण करण्यात आले आहे. बाराखडी आणि मी शाळकरी या कवितांमधून शिक्षणाचे महत्त्व आणि लहान वयातील बालसुलभ गमती-जमती सहज भाषेत मांडल्या आहेत. तर ओढ शाळेची ही कविता मुलांच्या शाळेबद्दलच्या प्रेमभावनेचा आणि उत्सुकतेचा सुंदर भावस्पर्शी अनुभव देते. या कवितांमधून प्रत्येक मुलाच्या मनातील शाळेचे स्थान, शिकण्याची ओढ आणि शाळेच्या दिवसांच्या आठवणींना उजाळा मिळतो. त्यामुळे हा काव्यसंग्रह केवळ वाचनाचा आनंद देणारा नसून, बालपणाच्या आठवणींना पुन:प्रत्यय देणारा ठरतो.

कवयित्री.महेमूदा शेख यांच्या कवितांमध्ये ग्रामीण जीवनाचे अनोखे चित्रण दिसून येते. मोट, बागेची शोभा, नदी म्हणे, झुंजूमुंजू, हरवली चूल, हरवलं बालपण, धनगरवाडा, आणि सोनेरी पहाट या कवितांमधून त्यांनी ग्रामीण संस्कृतीतील लुप्त होत चाललेल्या गोष्टी मुलांना सहज समजावून सांगण्याचा यशस्वी प्रयत्न केला आहे. त्यांच्या मोट कवितेतून एका काळातील जीवनशैलीची आठवण होते. मोट ही विहिरीतून पाणी काढण्यासाठी वापरण्यात येणारी पारंपरिक यंत्रणा होती, जी आता दुर्मीळ झाली आहे. मुलांना या मोटची कल्पना सहज समजावी, म्हणून कवयित्रींनी अत्यंत साध्या आणि प्रभावी शब्दांत तिचे चित्रण केले आहे. त्याचबरोबर २०२० बाय बाय, नवा पाहुणा, आणि सांग सांग कोरोना या कविता त्या विशिष्ट कालावधीशी संबंधित आहेत. त्या कवितांमधून त्या काळातील भावना आणि परिस्थितीचे प्रतिबिंब उमटते, ज्या कालांतराने फिकट होत जातील. कवयित्री महेमूदा शेख यांच्या काव्यसंग्रहात पारंपरिक ग्रामीण जीवन आणि समकालीन परिस्थितीचा सुंदर संगम दिसतो, जो वाचकांना भूतकाळाची आठवण करून देतो आणि त्यातून शिकण्यास प्रवृत्त करतो.

कवयित्री महेमूदा शेख यांनी आपल्या कवितांमधून शिक्षण आणि मनोरंजनाचा सुंदर मिलाफ साधला आहे. खेळ, दिशा, सूर्यमाला, अंकगणित, भारतातील नद्या, पक्ष्यांची शाळा, बाराखडी, मासे, फणसाचे झाड, जंगल दरबार, जंगल सफर, आकाशीचा चंद्र, वसंत ऋतू, फुलपाखरू, आणि फुलांचा सन्मान या कवितांमधून त्यांनी मुलांना विविध शैक्षणिक संकल्पना सहज आणि सुलभतेने समजावून देण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांच्या लेखनशैलीत साधेपणा आणि सहजता दिसून येते, जेणेकरून बालवाचकांना सहज कळेल आणि त्यांना कविता पाठ करण्यास गोडी वाटेल. बाराखडी या कवितेत त्यांनी मुलांना मराठी वर्णमालेची ओळख मनोरंजनाच्या माध्यमातून करून दिली आहे. सूर्यमाला आणि भारतातील नद्या या कवितांमधून निसर्गविज्ञान आणि भूगोल यांचा परिचय मिळतो, तर अंकगणित मधून गणिताची मूलतत्त्वे समजावून देण्याचा प्रयत्न आहे. पक्ष्यांची शाळा आणि जंगल सफर या कवितांमधून प्राणी आणि पक्ष्यांचे जग मुलांना अधिक जवळचे वाटते.

बाराखडी या कवितेत लिहितात

या बाळांनो या रे या बाराखडीची किमया पहा
अ ने म्हणू या अननस आंबट गोड त्याचा रस

कवयित्री महेमूदा शेख यांनी आपल्या कवितांमधून मुलांच्या भावविश्वाचा सुंदर वेध घेतला आहे.देवा रे देवा, भोपळ्याची निवडणूक, विदुषक, तहान, पाणी, लाडकी बाहुली, विमानाची नवलाई, देवबाप्पा, परी, आणि बाहुलीचं लगीन या कवितांमधून त्यांनी मुलांच्या मानसिकतेप्रमाणे स्वत: लहान होऊन त्यांच्या दृष्टीकोनातून विचार करण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला आहे. बाहुलीचं लगीन या कवितेतून त्यांनी मुलांच्या सहजतेने होणाऱ्या आनंदोत्सवाचे आणि त्यांच्या कल्पनाशक्तीच्या रम्य विश्वाचे चित्रण केले आहे. या कवितेत त्या लिहितात

**माझ्या बाहुलीचं लगीन**
**मांडव पडला गं दारी**
**सुरु झाला लगीन सोहळा**
**आमंत्रण दिले घरोघरी**

बालपणातील प्रत्येक उत्सव, छोट्या गोष्टींमध्ये असलेला आनंद आणि आपुलकीचे संस्कार ही कविता प्रभावीपणे व्यक्त करते. तसेच,वंशाचा दिवा, गर्भयातना, मर्मबंद, आणि सखे शेजारी या कवितांमधून मुलांमध्ये सामाजिक जाणीव रुजवण्याचा, त्यांना सामाजिक प्रश्नांची संवेदना निर्माण करण्याचा एक सुंदर प्रयत्न दिसून येतो. विशेषत: वंशाचा दिवा ही कविता मुलगी आणि मुलगा यांच्यात भेदभाव न करता समानतेचा संदेश देते, जो बालमनावर सकारात्मक प्रभाव टाकतो. याकवितेत त्या लिहितात

**मुलगा हवा मुलगा हवा**
**करू नका त्रागा**
**मुलगीही फुलविते**
**आयुष्याच्या बागा**

या कवितांमधून केवळ मनोरंजनच नव्हे, तर शिक्षण, संस्कार आणि समाजातील महत्त्वाचे विषय यांची सहज ओळख मुलांना करून दिली जाते. त्यामुळे महेमूदा शेख यांचा हा काव्यसंग्रह बालवाचकांसाठी प्रेरणादायी ठरतो. माझा देश या कवितेतून त्यांनी बालवाचकांमध्ये देशभक्तीची आणि भारताबद्दलच्या अभिमानाची भावना रुजवण्याचा यशस्वी प्रयत्न केला आहे. त्यांच्या लेखनशैलीतील साधेपणा आणि प्रामाणिकपणा मुलांच्या भावविश्वाशी सहज जुळणारा आहे. माझा देश या कवितेत कवयित्री महेमूदा शेख लिहितात

**माझा भारत देश महान**
**म्हणे त्याला कृषीप्रधान**
**नसे अन्नधान्यचा तोटा**
**मोठमोठ्या बाजारपेठा**

त्यांनी विविध काव्यप्रकारांचा प्रभावी वापर करत मराठी साहित्यविश्वात एक वेगळा ठसा निर्माण केला आहे. कवयित्री महेमूदा शेख यांचा गुलपरी हा संग्रह केवळ मुलांसाठीच नव्हे, तर प्रौढ वाचकांसाठीही तितकाच आकर्षक आणि विचारप्रवर्तक आहे. मुस्लिम मराठी साहित्यात बालसाहित्याची निर्मिती फारच कमी प्रमाणात झाल्याने, गुलपरी संग्रह हा त्या साहित्याला एक नवा आयाम देतो, हे निश्चित! कवयित्री महेमूदा शेख यांचा हा प्रवास असाच यशस्वी राहो, आणि त्यांच्या लेखणीमुळे वाचनसंस्कृतीला नवसंजीवनी मिळो, हीच सदिच्छा!

परीक्षण/समीक्षण : खाजाभाई बागवान, सोलापूर

पुस्तकाचे नाव : गुलपरी
लेखिका, कवयित्री : महेमूदा शेख
प्रकाशक : ललित पब्लिकेशन
प्रकाशन वर्षे :१२ जुलै २०२३
एकूण पृष्ठसंख्या : १०२
वाङ्मय प्रकार : बालकाव्यसंग्रह
मूल्य : १२० रु.

# सिंगल युज प्लास्टिकचा भस्मासूर रोखायलाच हवा अन्यथा परिस्थिती गंभीर ; ना. पंकजा मुंडे यांची परळीत जनजागृती मोहीम

## वैद्यनाथ मंदिरात कापडी पिशवी वेंडिंग मशीनचे उदघाटन; आनंदधाम येथे वृक्षारोपण तर मंदिर परिसरात स्वच्छता मोहिम

परळी वैजनाथ । प्रतिनिधी
पर्यावरण संरक्षण ही प्रत्येकाची जबाबदारी आहे. त्यामुळेच पर्यावरणाला घातक असणाऱ्या एकल प्लास्टिक वापराचा भस्मासूर आपल्याला रोखायलाच हवा, यासाठी कापडी पिशव्यांचा अधिकाधिक उपयोग करावा त्याचबरोबर आपला परिसर स्वच्छ कसा राहील यासाठी कचरामुक्त परिसरावरही लक्ष केंद्रित करून पर्यावरणाच्या दृष्टीने अत्यंत आवश्यक अशा वृक्षारोपणाकडेही प्रत्येकाने लक्ष द्यावे. एवढेच नाही तर एक झाड आई-वडिलांसाठी तर एक झाड हे आपल्या सृष्टीमातेसाठी लावावे आणि त्याचे संवर्धन करावे असे आवाहन राज्याच्या पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी येथे आज केले.
शहरातील आनंदधाम येथे सामाजिक वनीकरण विभागाच्या वतीने वृक्षारोपण, पर्यावरण विभाग व गोपीनाथ मुंडे प्रतिष्ठानच्या वतीने वैद्यनाथ मंदिरात 'नो प्लास्टिक' उपक्रमा अंतर्गत कापडी पिशवी मशीनचे उदघाटन पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते आज करण्यात आले, यावेळी आयोजित कार्यक्रमात त्या बोलत होत्या. वैद्यनाथ देवल कमिटीचे राजेश देशमुख, भाजपचे ज्येष्ठ नेते दत्तापा इटके, शहराध्यक्षा उमाताई समशेट्टे, उप जिल्हाधिकारी अरविंद लाठकर, तहसीलदार व्यंकटेश मुंडे, नगरपरिषद मुख्याधिकारी कांबळे, प्रदूषण नियंत्रण मंडळाचे कुरमूडे आदी उपस्थित होते.
मंदिर परिसरात नगरपरिषदेच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या स्वच्छता मोहिमेचा शुभारंभही पंकजाताई मुंडे यांच्या उपस्थितीत करण्यात आला.
पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'एक वृक्ष माँ के नाम' हा उपक्रम जाहीर केला आहे. यामध्ये एक आपली आई जीने आपल्याला जन्म दिला तिच्यासाठी एक वृक्ष व दुसरी आपली आई म्हणजे ही सृष्टी तिच्या संवर्धनासाठी एक वृक्ष लावला पाहिजे. त्याचे संवर्धन केले पाहिजे. यासाठी सर्वांनी प्रयत्न करायला हवेत. वृक्षारोपणाचे कार्यक्रम केवळ राजकीय स्वरूपात करू नका. फोटो पुरते करू नका. तर ते वृक्ष जगवण्यासाठी सुद्धा प्रयत्न करा असे आवाहन पर्यावरण मंत्री पंकजाताई मुंडे यांनी केले.

**प्लास्टिकमुक्तीचा दृढ संकल्प करा आणि कचरामुक्तीची कास धरा !**



सध्या पर्यावरण विभागाच्या वतीने अधिकाधिक प्लास्टिक मुक्तीवर भर दिला जात आहे. या दृष्टीने सर्व ते प्रयत्न केले जात असुन प्रत्येक नागरिकांनी या मोहिमेत सहभाग नोंदवला पाहिजे. यापुढे एकल प्लास्टिक वापरावर बंधने आणून अधिकाधिक कापडी पिशव्यांचा वापर करणे गरजेचे आहे. महाराष्ट्रातील मंदिरांमध्ये ही जाणीव जागृती निर्माण करण्याचा आपला प्रयत्न असुन सर्व देवालयांशी व देवस्थानांशी बोलून याबाबत आपण पुढचे पाऊल टाकणार आहोत. नागरिकांनी अधिकाधिक कापडी पिशव्यांचा वापर करावा त्यासाठी घरातील पिशवी आणावी किंवा आपण ठिकठिकाणी कापडी पिशव्यांचे मशीन बसवणार आहोत याचा अधिकाधिक वापर करावा असे आवाहन पंकजाताई मुंडे यांनी केले.

**लोकसहभाग महत्वाचा**

पर्यावरण संवर्धनाचे कार्यक्रम व उपक्रम राबविण्यात येत आहेत मात्र हे केवळ प्रशासकीय पातळीवरच मर्यादित राहू नयेत यासाठी जास्तीत जास्त लोकसहभागातून हे उपक्रम यशस्वी होतील. यासाठी लोकसहभागावर भर देण्यात येत आहे. पर्यावरण संरक्षण व संवर्धनाची माझ्यापासून सुरुवात करणार असुन यापुढे माझ्या परळीतील यश:श्री व मुंबईतील रामटेक या शासकीय निवासस्थानी जे अभ्यागत मला भेटायला येतील त्यांनी प्लास्टिक पिशव्या मधून आणलेले बुके आणू नयेत. एवढेच नाही तर मला भेटायला येणाऱ्यांनी हातात प्लास्टिक पिशव्या घेऊन बुके, हारतुरे आदी आणले तर त्यांना प्रवेश बंदी केली जाईल. अधिकाधिक प्लास्टिक मुक्तीसाठी आपल्याला हे प्रयत्न करायचे आहेत. त्यामुळे प्रत्येक ठिकाणी आपण प्लास्टिक मुक्तीची व स्वच्छतेची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने प्रयत्नशील राहावे असेही पंकजाताई मुंडे यांनी आवाहन केले.

**मध्यप्रदेशातील स्वच्छतेसारखे आपले राज्यही स्वच्छ करुया**

मध्य प्रदेशातील स्वच्छता जर बघितली तर ती खरोखरच कौतुकास्पद आहे. मध्य प्रदेशातील स्वच्छतेचे कौतुकच केले पाहिजे. परंतु महाराष्ट्रात मात्र अशा पद्धतीची स्थिती सध्या तरी नाही हे चिंताजनक आहे. हे चित्र आपल्याला बदलायचे आहे. त्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांनी जबाबदारीपुर्वक काम करावे त्याबरोबरच नागरिकांनीही स्वच्छतेच्या दृष्टीने प्रयत्न करणे गरजेचे आहे. महाराष्ट्रात प्लास्टिक मुक्त आणि कचरा मुक्त परिसर यासाठी प्रयत्न करण्यात येणार आहेत. आपल्याकडे याबाबतीत नागरिकांनी जबाबदारीने या गोष्टीचे तंतोतंत पालन केले तर काही दिवसातच आपले महाराष्ट्र राज्य ही स्वच्छ व सुंदर परिसराचे होईल यात काहीही शंका नाही. सध्या पर्यावरण विभागाच्या वतीने अधिकाधिक भर दिला जात आहे. या दृष्टीने सर्व ते प्रयत्न केले जात असुन प्रत्येक नागरिकांनी या मोहिमेत सहभाग नोंदवला पाहिजे असेही आवाहन पंकजाताई मुंडे यांनी केले.

**राज्यभरातील मंदिरांशी चर्चा करणार**

राज्यभरातील मंदिरांशी चर्चा करुन कापडी पिशव्या वापरण्याचा आग्रह धरण्यात येणार आहे. राज्यात मोठ्या प्रमाणात मंदिरं आहेत या मंदिरांमधून सिंगल युज प्लास्टिकचा वापर कमी व्हावा त्याऐवजी कापडी पिशव्या वापरल्या जाव्यात याकरिता आम्ही प्रयत्न करत आहोत अनेक संस्थांशी पत्रव्यवहार देखील केला आहे. त्या दिशेने काम करत असल्याचे पंकजाताई मुंडे यांनी सांगितले.

# अल्पसंख्याक विद्यार्थ्यांमध्ये शैक्षणिक प्रवृत्ती वाढत असल्याची बाब स्वागतार्ह आहे : संतोष सोमवंशी

लातूर । प्रतिनिधी
शिक्षण मिळवण्यासाठी बुद्धिमत्ता आणि इच्छाशक्ती आवश्यक आहे. हाच पाया धरून शिक्षण घेतल्यास यश आणि आपल्या ध्येयापर्यंत पोहोचण्यास कोणतीही अडचण येणार नाही, असे लातूर जिल्हा शिवसेना (उबाठा) अध्यक्ष संतोष सोमवंशी यांनी सांगितलं. खुंदमीर मुल्ला मित्र मंडळ आणि मिल्लत ए अंजुमन महदविया औसा यांच्या संयुक्त विद्यमाने, ख्वाजा बंदा नवाज हसीना गर्ल्स हायस्कूल ओसा येथे, शहरातील एसएससी आणि एचएससीमध्ये यशस्वी झालेल्या सर्व अल्पसंख्याक विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. त्यांना पाहुण्यांच्या हस्ते प्रशस्तीपत्र, शाळा/कॉलेज बॅग देऊन सत्कार करण्यात आले.
शिवसेना महिला आघाडीच्या अध्यक्षा जया ताई अटगे, महाराष्ट्र किसान परिषद अध्यक्ष राजीव कसबे, माजी नगरसेवक अंगद कांबळे, सय्यद अब्दुलहमीद, डॉ. वहीद कुरेशी, प्रा. अब्दुलवहाब मलेभारी, शिक्षक संघटनेचे




अब्दुसलीम अलंद, जमादार सर, संजय अजळंबे, माजिद अली काझी, ऑर्बिट स्कूलचे संस्थापक ॲड. इक्बाल शेख, शादाब हनुरे हे उपस्थित होते.
ज्येष्ठ पत्रकार मोहम्मद मुस्लिम कबीर यांनी विद्यार्थ्यांना संबोधित करताना सांगितलं की, इस्लाम शिक्षणाच्या प्राप्तीत कधीच अडथळा ठरत नाही, उलट शिक्षण मिळवणं हे पुरुष आणि महिलांसाठी बंधनकारक केलं आहे. मुलींनी देखील पडद्यामध्ये राहून उच्च शिक्षण घेता येतं आणि जिथे बुद्धिमत्ता असते तिथे आर्थिक अडचण येत नाही, हे अलीकडेच यवतमाळच्या आयएएस यशस्वी विद्यार्थिनी अदिबा अनम हिने सिद्ध केलं आहे. शिवसेनेच्या जया ताई अटगे यांनी सांगितलं की, यशस्वी मुलींची संख्या पाहून आनंद झाला आणि कोणत्याही सरकारी किंवा खासगी कामात मदत करू, असं आश्वासन दिलं.
सामाजिक कार्यकर्ते खुंदमीर मुल्ला यांनी प्रारंभिक भाषणात सांगितलं की, गेल्या काही वर्षांपासून खुंदमीर मुल्ला मित्र मंडळ आणि मिलत अंजुमन महदविया औसा यांच्या वतीने यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार केला जातो. यावर्षी शहरातील सहा मुस्लिम विद्यार्थी एमबीबीएसला यशस्वी झाले, त्यांचाही सत्कार करण्यात आला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अजीम अलूरे, झिशान सय्यद, अरबाज खान पठाण, गौस चौधरी, नेमत अलूरे, इब्राहिम तत्तापूरे यांनी मेहनत घेतली.

# प्राचार्य डॉ. वसंत माळी यांच्या पुढाकाराने श्रीलंकेतील कोलंबो येथे बहुशाखीय आंतरराष्ट्रीय परिषद संपन्न

कडा । प्रतिनिधी
कडा येथील आनंदराव धोंडे महाविद्यालयाचे माजी प्राध्यापक व सध्या कल्याण येथे कार्यरत असलेले प्राचार्य डॉ. वसंत माळी यांच्या पुढाकाराने श्रीलंकेतील कोलंबो येथे बहुभाशीय आंतरराष्ट्रीय परिषद घेण्यात आली.जे. जे. टी. विद्यापीठ राजस्थान व आय.सी.बी.टी. कॅम्पस कोलंबो, श्रीलंका यांच्या संयुक्त विद्यमाने आणि सोसायटी ऑफ सायन्स, टेक्नॉलॉजी अँड ह्युमॅनिटी, कल्याण व जे. वाटुमल साधुबेला गर्ल्स कॉलेज, उल्हासनगर यांच्या सहकार्याने घेण्यात आलेले बहुशाखीय आंतरराष्ट्रीय परिषद नुकतेच आयसीबीटी कॅम्पस कोलंबो (श्रीलंका) येथे पार पडली. या परिषद उद्घाटनप्रसंगी डॉ. इंदुरंगा चमेंद्रा, डॉ. अनोका अनासकी दिशानायके, डॉ. अशोक चव्हाण, डॉ. दीनदयाल मुरारका, डॉ. राजेश कुमार, डॉ. वसंत माळी, डॉ.अंजु सिंग, डॉ. कनिका विडांगे इ. उपस्थित होते. परिषदेच्या सुरुवातीला डॉ. अशोक चव्हाण (छ. संभाजीनगर), डॉ. नारायण फडके (मुंबई) व डॉ. स्वप्ना समेल (कल्याण) यांना त्यांच्या शैक्षणिक, सामाजिक व प्रशासकीय भरीव योगदानाबद्दल जीवनगौरव पुरस्काराने



सन्मानित करण्यात आले. याप्रसंगी परिषदेत तीन प्राध्यापकांचे व्याख्यान आयोजित केले होते.
ऑनलाइन व ऑफलाइन माध्यमातून ८३ हून अधिक शोधकर्त्यांनी आपल्या संशोधन कार्याचे मौखिक सादरीकरण सादर केले. परिषदेचे प्रसारण फेसबुक लाईव होते तसेच श्रीलंका येथील टी.व्ही. वाहिण्यावर प्रसारीत करण्यात आले होते. युवा संशोधकांना प्रोत्साहित करण्यासाठी डॉ.अशोक चव्हाण रिसर्च फाउंडेशन व सोसायटी ऑफ सायन्स टेक्नॉलॉजी अँड ह्युमॅनिटी यांच्या वतीने विविध पारितोषिकांचे आयोजन करण्यात आले होते. या चर्चासत्रात वैभव मिसाळ यांनी सर्वोत्कृष्ट मौखिक सादरीकरण, अजय झिंजाडे यांनी युवा संशोधक तर डॉ. राणी भगत यांनी नाविन्यपूर्ण संशोधन ही पारितोषिके पटकावली. परिषदेनंतर वेगवेगळ्या ठिकाणी भेट देऊन अभ्यास केला. कॅन्डी येथील पेरीडोनीया बोटॅनिकल गार्डनला भेट देऊन तेथील विविध वनस्पतीचा अभ्यास केला. पिनावाला हत्ती संगोपन केन्द्रला भेट दिली, तसेच बेन्टोटा येथील कासव संगोपन केन्द्रला भेट देऊन प्लास्टिकचा कासवांच्या जिवावर काय परीणाम होतो. जेली फीश समजून प्लास्टिक गिळंकृत करतात नंतर कासव खोल पाण्यात जाऊ शकत नाहीत.
औषधी वनस्पतींच्या आणि स्पाईस गार्डन भेट देऊन प्रत्यक्ष वनस्पती बघुन ऊपयोग समजून घेतले. एतीहासीक स्थळांना भेटी दिल्या. सिगेरिया राक, द्बबोला केव, गोल्डन टेम्पल, दंबुला, अशोक वाटीकेला भेट दिल्यानंतर रामायणातील आठवणी ताज्या झाल्या. चहाच्या कंपनीला भेट देऊन प्रत्यक्ष चहा पावडर कसी केली जाते याचा अभ्यास केला. परिषद यशस्वीरित्या पार पाडण्याकरिता परिषदेचे संयोजक प्राचार्य डॉ. वसंत माळी, जे वाटुमल साधुबेला महिला महाविद्यालय, संयोजिका डॉ अंजू सिंग यांनी विशेष प्रयत्न केले. त्याबद्दल संस्थेचे अध्यक्ष उत्तमसिंग पवार, माजी आमदार भीमराव धोंडे, प्राचार्य डॉ हरिदास विधाते, सचिव नितीन बागवे, प्राचार्य एम एस कुऱ्हाडे, प्राचार्य नारायण फडके, प्राचार्य युवराज महाजन, प्रा.हीनल वाधवा, प्रा.राजेश कुमार सिंग, डॉ.दत्तात्रय काळबांडे, प्रा. शर्मिला कर्वे, अर्चना वर्मा, पुणम, सहीता नानकी, माला अंभोरे यांनी अभिनंदन केले. या अगोदर पण प्राचार्य डॉ. वसंत पंडीत माळी यांनी विविध देशात आंतरराष्ट्रीय परिषदचे आयोजन केलेले आहे. बँकॉक, दुबई, मलेशिया, ईडोनेशिया, पॅरिस (युरोप), मॉरिशस, व्हिएतनाम, पोस्ट टुर परिषदेचे नियोजन, होली डे क्वाडरन्ट, तेजस पानसकर, प्रथमेश कुलकर्णी, गरूडा टूर्स अन्ड ट्रॅव्हल, कौस्तुभ माळी, यांनी केले होते.



परळी : राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंती निमित्त श्री खंडोबा मंदिर होळकर चौक परळी येथे ध्वजारोहण व शहरातील मुख्य रस्त्यावरून भव्य महिलांची रॅली काढून वैजनाथ मंदिर येथील राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिकृतीस दुध अभिषेक, आरती करून अभिवादन, पूजा करून व पुष्पहार घालून अभिवादन करताना परळी शहराचे माजी नगराध्यक्ष बाजीराव (भैया) धर्माधिकारी, राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते वैजनाथ सोळंके, संपादक बालाजी जगतकर, नगरसेवक गोविंद कुकर, अनिल अष्टेकर, जालिंदर नाईकवाडे, मुंजा फुके, महेंद्र रोडे, सचिन स्वामी, अध्यक्ष आकाश कुकर, आकाश सरवदे, शिवा सरवदे बजरंग सरवदे, लक्ष्मण बोबडे, हनुमान सरवदे, माणिक सरवदे, नवनाथ दाणे, शेषराव सरवदे महिला पुरुष लहान मुलं मुली मोठ्या संख्येने अभिवादन करण्यासाठी उपस्थित होते.

# रियांश मल्टिट्रेड कंपनीतर्फे प्रियंका वडमारे (शिंदे) यांची दुबई टूरसाठी निवड

बीड । प्रतिनिधी
भिमराज नगर, राजूरिवेस, बीड येथील मूळ निवासी असलेले सतीश वडमारे यांच्या पत्नी सौ प्रियंका वडमारे (शिंदे) या रियांश मल्टिट्रेड प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीमध्ये प्लॅटिनम डायरेक्टर या रँक वर असून त्या कंपनीचे फूड सप्लीमेंट आयुर्वेदिक प्रॉडक्ट रियांश अमृत ज्यूस व इतर चांगल्या प्रॉडक्टसच्या माध्यमातून लोकांना आरोग्य तसेच आरोग्यासोबत रोजगार देण्याचे कार्य करत आहेत. त्यांना कंपनीचे चांगल्या कामाबद्दल कंपनीतर्फे सहा दिवसाच्या दुबई टूर साठी निवड झाली आहे.



या निवडीबद्दल प्रियांका शिंदे यांनी कंपनीचे सर्वेसर्वा आदरणीय सीएमडी मधुकरजी जाधव सर, एमडी पूजा जाधव मॅडम तसेच मार्गदर्शक आदरणीय शेख जमील सर, ब्लू डायमंड यांचे आभार व्यक्त केले आहेत. तसेच सोबत असलेले सर्व लीडर्स व कुटुंबातील सर्व सदस्य व मित्र परिवार यांचेपण आभार व्यक्त केले आहेत. तसेच लोकांना चांगले आरोग्य देऊन त्यामाध्यमातून चांगल्या रोजगाराचे संधीसाठी संपर्क करण्याचे आवाहन केले आहे.

# राजमाता आहील्यादेवी होळकर जयंती निम्मित चोंडी येथे हजारोच्या संख्येने उपस्थित रहा-विठ्ठल हरकळ

अंबाजोगाई । प्रतिनिधी
जामखेड तालुक्यातील चौंडी येथे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जन्मस्थळी ३१ मे रोजी त्यांचा जयंती महोत्सव साजरा होणार आहे. अहिल्यादेवींचे काम हे जगभर प्रसिद्ध आहे. हे त्रिशताब्दी वर्ष आहे. तरी या दिवशी सर्व समाज बांधवानी जास्तीत जास्त संखेने हजर रावे असे आव्हान विठ्ठल हरकळ यांनी केले आहे.



जामखेड तालुक्यातील चौंडी येथे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जन्मस्थळी ३१ मे रोजी त्यांचा जयंती महोत्सव साजरा होणार आहे.अहिल्यादेवींचे काम हे जगभर प्रसिद्ध आहे. हे त्रिशताब्दी वर्ष आहे. या जयंती महोत्सवासाठी केंद्रीय मंत्री ज्योतिरादित्य शिंदे व होळकर घराण्याचे वंशज युवराज तिसरे यशवंतराव होळकर यांना विशेष निमंत्रित केले आहे. त्याचबरोबर मे महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यामध्ये त्यांना अभिवादन करण्यासाठी पन्नास हजार धनगरी ढोल वाजवण्याचं आणि विश्वविक्रम करण्याचं अहिल्याभक्तांनी ठरवलं आहे. धनगर समाजातून ज्या काही परंपरा आहेत त्या स्वतंत्र आहेत. त्याच पद्धतीने धनगरी ढोल हा धनगरांच्या भावनेचा विषय आहे. त्याचमुळे अहिल्यादेवींच्या जयंतीच्या निमित्ताने धनगरी ढोल वादनाचा कार्यक्रम पाहता येणार आहे. हा कार्यक्रम विश्वविक्रमी करण्याचा समाज बांधवांनी ठरवले आहे. तरी या दिवशी सर्व समाज बांधवानी जास्तीत जास्त संखेने हजर रावे असे आव्हान विठ्ठल हरकळ यांनी केले आहे.

# पं.स. माणगांव सहाय्यक प्रशासन अधिकारी स्नेहल मोरे यांचा शासनाकडून गुणवंत अधिकारी म्हणून गौरव

बोरघर, माणगांव । प्रतिनिधी
शासनाच्या ग्राम विकास विभागांतर्गत राज्य शासनाच्या तसेच केंद्र पुरस्कृत अनेक योजना व प्रकल्प राबविले जातात. अशा काही योजना, प्रकल्प राबवितांना संबंधित अधिकारी तसेच कर्मचाऱ्यांचे प्रशासकीय तसेच तांत्रिक कौशल्य पणाला लागते. असे प्रकल्प पूर्ण करताना अधिकारी, कर्मचाऱ्यांमध्ये विशेष वैयक्तिक कौशल्य व गुणवत्ता आढळून येते. अशा अधिकारी, कर्मचाऱ्यांचा गौरव करण्याची योजना शासनाने ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय, दिनांक २ सप्टेंबर २००५ अन्वये सन २००५-२००६ पासून सुरु केली आहे. त्यानुषंगाने सन २०२३-२०२४ या वर्षी ग्राम विकास विभागातील मंत्रालयातील व क्षेत्रिय स्तरावरील गुणवंत अधिकारी, कर्मचाऱ्यांना प्रशस्तीपत्र व सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.
सदर निर्णयाच्या अनुषंगाने सन २०२३-२४ या वर्षाकरीता गुणवंत अधिकारी,कर्मचारी यांची पुरस्कारा साठी अंतिम निवड करण्यात आली. या मधील पंचायत समिती माणगांव जिल्हा रायगड च्या सहाय्यक प्रशासन अधिकारी श्रीमती स्नेहल सुनील मोरे मॅडम यांच्या कर्तव्य दक्ष, कार्यतत्पर आणि प्रामाणिक प्रशासकीय सेवेचा शासन नियोजित गौरव समारंभ कार्यक्रमात गुणवंत सहाय्यक प्रशासनअधिकारी म्हणून पुरस्कार व गौरव महामहिम सी.पी. राधाकृष्णन राज्यपाल महाराष्ट्र राज्य यांच्या उपस्थितीत ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, एकनाथ डवले प्रधान सचिव ग्रामविकास व पंचायत राज विभाग,





डॉ. विजय सुर्यवंशी कोकण विभागीय आयुक्त आणि महाराष्ट्र शासनाच्या विविध विभागाचे मान्यवर यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात झाला.
श्रीमती स्नेहल सुनील मोरे या १९९० पासून सेवेत रुजू झाल्या असून त्यांनी आजवर शासनाच्या ग्रामविकास व पंचायत राज विभागातील विविध महत्वपूर्ण पदांची जबाबदारी कार्यक्षमपणे सांभाळली आहे. माणगांव पंचायत समिती कार्यालयातील एक कार्यतत्पर आणि लोकाभिमुख कर्तव्यदक्ष आणि कार्यतत्पर सहाय्यक प्रशासन अधिकारी म्हणून त्यांनी जनमानसात ओळख निर्माण केली आहे. माणगांव पंचायत समिती कार्यालयात आपापल्या कामा निमित्त तालुक्याच्या विविध भागातून येणाऱ्या सर्व सामान्य नागरिकांना आणि आपल्या कार्यालयीन सहकार्यांना त्या नेहमी चांगली वागणूक देऊन त्यांचे हसतमुखाने स्वागत व योग्य ते मार्गदर्शन करत असतात. त्यांनी खादी कपड्यांचा वापर या बाबत जनजागृती केली आहे. त्यांनी आजवर अनेक प्रकारच्या स्पर्धा परीक्षार्थींना यु ट्युब आणि झूम प्रणाली च्या माध्यमातून लेक्चर आणि मार्गदर्शन केले आहे.
महाड येथील आपत्कालीन परिस्थितीत तत्परतेने पूरग्रस्त महिलांना मदत केली आहे. त्याच बरोबर शासनाच्या महत्वाकांक्षी योजना, महत्वपूर्ण धोरण आणि प्रकल्प समाजातील शेवटच्या घटकापर्यंत प्रामाणिकपणे पोहचवण्यासाठी नेहमी अग्रेसर राहून आपले वैयक्तिक बुद्धी कौशल्या बरोबर तांत्रिक कौशल्य पणाला लावून लोकाभिमुख काम केले आहे आणि करत आहेत. त्यांच्या या कार्याची दखल घेऊन शासनाने त्यांना गुणवंत सहाय्यक प्रशासन अधिकारी म्हणून प्रशस्तीपत्र देऊन गौरवण्यात आले. त्यामुळे त्यांच्या सहकारी वर्गातून, कुटुंबातून, नातेवाईक, आप्त परिवार आणि हितचिंतकाकडून त्यांना प्रत्यक्ष भेटून आणि सोशल मीडियाच्या विविध साईड वरून त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव सुरू झाला आहे.

# बीड जिल्हा स्थानिक गुन्हे शाखेला कर्तव्यदक्ष दबंग पोलीस निरीक्षक मिळाल्यामुळे बीड जिल्ह्यामध्ये सर्वत्र त्यांचे होत आहे अभिनंदन

बीड । प्रतिनिधी
बीड जिल्हा पोलीस दलामध्ये सर्वात महत्त्वाची असलेली स्थानिक गुन्हे शाखा या स्थानिक गुन्हे शाखेला अतिशय कर्तव्यदक्ष आणि बीड जिल्ह्याचा सखोल ज्यांना अभ्यास झाला आहे असे दबंग आणि कर्तव्यदक्ष पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड साहेब हे स्थानिक गुन्हे शाखेला मिळाल्यामुळे बीड जिल्ह्यामधून त्यांनी केलेल्या मागील बीड ग्रामीण पोलीस स्टेशनच्या उत्कृष्ट कर्तव्याबद्दल सर्व नागरिकांमधून बीड जिल्ह्यातील समाधान व्यक्त होत आहे. बीड जिल्ह्यामधून सर्वत्र सध्या साहेबांचे अभिनंदन व कौतुक होत आहे.
याच पार्श्वभूमीवर त्यांच्या मागील उत्कृष्ट पोलीस प्रशासकीय कर्तव्याच्या बाबतीत लोकशाही पत्रकार संघाच्या वतीने समाधान व्यक्त करून त्यांना पुढील प्रशासकीय कार्यास शुभेच्छा देण्यासाठी महाराष्ट्र राज्य लोकशाही पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष बीबी वैद्य तसेच महाराष्ट्र राज्य लोकशाही पत्रकार संघाचे महाराष्ट्र सचिव सुनील दादा महाकुंडे तसेच नारायण शिंदे व लोकशाही पत्रकार संघाचे बीड जिल्हा संघटक संजय देवा कुलकर्णी कुक्कडगावकर तसेच स्वराज्य वृत्त या वर्तमानपत्राचे मुख्य संपादक अनिल कचरे तसेच बीड येथील बस स्टँड वर अतिशय उत्कृष्ट आणि चांगल्या प्रकारे सर्वांच्या गाड्या सांभाळण्याचे कार्य करणारे असे पत्रकार संघाचे सदस्य अत्तर भाई खान सह मान्यवर उपस्थित होते.



साहेबांचे अभिनंदन व पुढील कार्यास शुभेच्छा दिल्यानंतर साहेबांनी सांगितले की बीड जिल्ह्यामध्ये कोणाचीही गुंडगिरी किंवा भाईगिरी खपवून घेतली जाणार नाही. त्यांच्या वरती कायदेशीर कारवाई करण्यात येईल कोणी जर गुंडगिरी किंवा भाईगिरी करण्याचा प्रयत्न केला विनाकारण कोणाला कोणी त्रास दिला तर डायरेक्ट माझ्याशी संपर्क करा असे उद्गार देखील साहेबांनी लोकशाही पत्रकार संघांचा मनस्वी सत्कार स्वीकारल्यानंतर मोजक्या शब्दात आपले मनोगत व्यक्त केले.
या नंतर बीबी वैद्य साहेब यांनी साहेबांना शुभेच्छा दिल्यानंतर पुढील मनस्वी त्यांच्या थोडक्यात सदिच्छा व्यक्त करताना सांगितले की, बीड ग्रामीण पोलीस स्टेशन अंतर्गत असलेल्या सर्व गावांना शिवाजी बंटेवाड साहेबांनी सातत्याने भेटी देऊन गावातले छोटे-मोठे तंटे मिटवण्यामध्ये आणि गोरगरीब सर्वसामान्य माणसाला न्याय मिळवून देण्यामध्ये एक मोठे यश संपन्न केले आहे आणि लोकांच्या मनामध्ये एक आगळवेगळे आपले स्थान निर्माण केले आहे तसेच आपले पुढील पोलीस प्रशासकीय कर्तव्य ते भविष्यात बीड जिल्हा पोलीस दलातील एक महत्त्वाच्या असलेल्या स्थानिक गुन्हे शाखेच्या माध्यमातून बीड जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था राखण्यामध्ये मोठे यश मिळवतील आणि बीड जिल्हा पोलीस दलाचे नाव व बीड जिल्हा स्थानिक गुन्हे शाखेचे नाव महाराष्ट्रामध्ये एक आगळे वेगळे चांगल्या प्रकारे पोलीस प्रशासकीय कर्तव्य त्यांच्या सर्व स्थानिक गुन्हे शाखेच्या सर्व टीमच्या माध्यमातून ते उत्कृष्ट प्रकारे बजावून एक आदर्श महाराष्ट्रमध्ये निर्माण करतील असी अपेक्षा ही यावेळी लोकशाही पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष बीबी वैद्य यांनी सदिच्छा पर व्यक्त केली.

# लिंबागणेश येथील अतिक्रमणाचा प्रश्न चिघळला

## गटातटाच्या हेवेदाव्यात, हातावर पोट भरणाऱ्या गरीबांच्या अन्नात माती कालवली जाणार; गोरगरीबांचा सहानुभूती पुर्वक विचार करावा : डॉ.गणेश ढवळे

लिंबागणेश । प्रतिनिधी




बीड तालुक्यातील जिल्हा परिषद सर्कलचे गाव असणाऱ्या लिंबागणेश गावातील सार्वजनिक बांधकाम विभाग आणि गावठाणच्या स्मशानभूमीत कित्येक वर्षांपासून हातावर पोट भरणाऱ्या हॉटेल, पानटपरी व लहान सहान उद्योग करणाऱ्या गोरगरिबांच्या अन्नात माती कालवली जाणार असून गावातील गटातटाच्या हेवेदाव्याचा या गोरगरीबांना आर्थिक फटका बसणार असल्याची चिन्हे दिसत असुन रविंद्र निर्मळ यांनी गावगुंड हाताशी धरून महामंडळाच्या कॅन्टीन जागेवर पत्र्याचे शेड टाकुन अतिक्रमण केले असून चौकशी करून कारवाई करण्यात यावी अशी कोणाचीही स्वाक्षरी न करता केवळ गावातील प्रतिष्ठित १२ लोकांची नावे टाकुन तहसीलदार बीड यांच्याकडे यांच्याकडे लेखी तक्रार करण्यात आल्यानंतर काल दि.०१ रविवार रोजी तलाठी गणपत पोतदार, मंडळ अधिकारी जायभाये आणि डेपो मॅनेजर डोके यांनी घटनास्थळी पाहणी करून काम थांबवले.

त्यामुळे रविंद्र निर्मळ यांनी आज दि.०२ सोमवार रोजी तहसीलदार बीड यांना लिंबागणेश गावातील गट नंबर १ मधील राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५४८ डी महामार्गाच्या दोन्ही बाजूंनी असलेली सर्वच अतिक्रमणे काढण्यात यावीत. तसेच स्मशानभूमीची मोजणी करून खुणा करून हद्द कायम करून देण्यात यावी. लिंबागणेश ते जुना वैद्यकिन्ही रस्ता शासकीय ३३ फुटाचा रस्ता असुन मोकळा करून देण्यात यावा तसेच तसेच लिंबागणेश ते वाघिरा जुना रस्ता ३३ फुटाचा शासकीय रस्ता असुन तो मोकळा करून देण्यात यावा अन्यथा ३० जुन रोजी तहसीलदार बीड यांच्या दालनात आत्मदहन करणार असल्याचा इशारा लेखी निवेदनाद्वारे तहसीलदार बीड यांना दिला आहे.

### दलित कार्यकर्त्या विरोधात षडयंत्र; न्याय न मिळाल्यास आत्मदहन करणार : रविंद्र निर्मळ

माझ्या शेड विरोधात तहसीलदार यांना दिलेली तक्रार खोटी असुन तक्रारदार यांच्या निवेदनावर स्वाक्षरी नाहीत. तसेच त्यांना विचारणा केली असता आम्हाला माहीत नसल्याचे सांगितले. तसेच बसस्थानक ठिकाणी ३०बाय २० ची सहन जागा शिल्लक असुन या जागेवर महिलांसाठी, प्रवाशांसाठी सहन जागा शिल्लक आहे. काही जातीयवादी लोकांनी गावात तेढ निर्माण करण्यासाठी राजकीय सुबुद्धीने एका दलित कार्यकर्त्या विरोधात रचलेले षडयंत्र आहे. त्यामुळे मला न्याय न मिळाल्यास तहसीलदार यांच्या दालनात आत्मदहन करणार असल्याचे रविंद्र निर्मळ यांनी म्हटले आहे.

### अतिक्रमण काढण्याच्या नावाखाली शासनाने हातावर पोट भरणाऱ्या गोरगरिबांच्या अन्नात माती कालवु नये : डॉ. ढवळे

लिंबागणेश येथील आठवडाभरात अतिक्रमण काढण्यासाठी केलेल्या गटातटाच्या तक्रारी मधुन गावातील आणि परीसरातील पत्र्याच्या शेडमध्ये हातावर पोट भरणाऱ्या हॉटेल, पानटपरी, विद्युत मोटरी दुरूस्ती, मांसविक्रेते, जनरल स्टोअर्स, किराणा दुकान, हार्डवेअर आदी ७० पेक्षा जास्त दुकानातून गोरगरीबांच्या कुटुंबांचा उदरनिर्वाह चालत असुन शासनाने सर्वच अतिक्रमण धारकांवर कारवाई करत अतिक्रमण काढण्यापुर्वी सहानुभूती पुर्वक विचार करावा अशी मागणी डॉ.गणेश ढवळे यांनी केली आहे.

महावितरणच्या हलगर्जीपणामुळे कंत्राटी कर्मचाऱ्यांवर आली उपासमारीची वेळ

# पाटोदा महावितरण कंत्राटी कर्मचाऱ्यांचे काम बंद आंदोलन

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा येथील महावितरण उपविभाग या ठिकाणी जवळपास ३२ कंत्राटी कामगार असून या कामगारांना मार्च महिन्यापासून अद्याप पगार न मिळाल्यामुळे या सर्व कंत्राटी कर्मचाऱ्यांनी दिनांक एक जून पासून काम बंद करण्याचा इशारा दिला असून त्या प्रकारचे निवेदनही त्यांच्या उपअभियंता महावितरण पाटोदा यांना देण्यात आले आहे.

महावितरण च्या पाटोदा विभागात कार्यरत सर्व कंत्राटी कर्मचारी मार्च २०२५ पासून वेतनाविना काम करत असून त्यांना वेळोवेळी पगार न मिळाल्याने त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली आहे. पगाराबाबत प्रत्येक वेळी आश्वासन देऊन त्याची कुठेही अंमलबजावणी झाली नाही. त्यामुळे त्यांचा संयम आता संपत आला आहे. वेळोवेळी विनंती अर्ज आणि निवेदन देऊनही वेतन न मिळाल्याने आता या कर्मचाऱ्यांनी रविवार दि. १ पासून काम बंद आंदोलन सुरू केले आहे. मागील तीन महिन्याच्या थकीत वेतनासाठी दहा मे रोजी निवेदन देण्यात आले होते परंतु त्याची दखल घेण्यात आली नाही. याबाबत पुन्हा कर्मचाऱ्यांनी २६ मे रोजी मुख्य अभियंता औरंगाबाद व विभागीय कार्यालयांना निवेदन देत काम बंद करण्याचा इशारा दिला होता.

तीन महिन्यांपासून पगार रखडले असल्यामुळे कंत्राटी कर्मचाऱ्यांना बेमुदत संपावर जाण्याची वेळ आलेली आहे. तरी सर्व कंत्राटी कर्मचारी एक जून २०२५ पासून संपावर गेले आहेत.

# अवकाळी पावसाने भेंडटाकळी येथील सोलर पॅनलचे नुकसान

जातेगाव । प्रतिनिधी



मागील काही दिवसांपासून चालू असलेल्या अवकाळी पावसाने शेतकऱ्यांच्या पिकाचे तसेच सोलर पॅनलचे नुकसान होत आहे. त्या बरोबर गेल्या २० ते २२ दिवसापासून अचानक आलेला वादळी वारा, अवकाळी पाऊस आणि गारपीटीमुळे जिल्ह्यातील शेतकर्याच्या उन्हाळी उभ्या पिकाचे नुकसान होत असून, शेतात लावलेल्या सौर उर्जा पॅनललाही मोठा तडाखा बसत आहे.

गेवराई तालुक्यातील कांबी (मजरा) येथील शेतकरी दुशांत खौसा वाव्हळ यांची जमीन शेजारील भेंडटाकळी या ग्रामपंचायत मधील शिवारातील गट नंबर १६६ मध्ये आहे. दि.५ मे २०२५ रोजी अचानक आलेला अवकाळी पाऊस आणि वादळी वार्यामुळे दुशांत खौसा वाव्हळ यांच्या भेंडटाकळी शिवारातील गट नंबर १६६ मधील शेतात लावलेल्या सौर उर्जा पॅनल चे नुकसान झाले.

दुशांत खौसा वाव्हळ यांनी स्पॅन एनर्जी या कंपनीचा ३ एच चा कुसुम योजनेअंतर्गत आपल्या शेतात स्पॅन एनर्जी सोलर कंपनीचे सौर पंप व पॅनल आपल्या शेतात बसविले होते. मात्र, वादळी वारा व पावसाने या सौर पॅनलचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून, हे पॅनल पावसाच्या तडाख्यात सापडून दोन पॅनल चे काच फुटले आहे. या अचानक आलेल्या या अस्मानी संकटामुळे शेतकऱ्यापुढे नवे आव्हान उभे ठाकले आहे.

# माजलगाव-तेलगाव रस्त्याचे तात्काळ डांबरीकरण करण्याची मागणी

## मुक्या, बहिऱ्या शासनाला जागे करण्यासाठी ५जुनच्या रास्ता रोकोत सहभागी व्हा : ॲड.नारायण गोले

माजलगाव । प्रतिनिधी




माजलगाव–तेलगाव रस्ता गेल्या अनेक महिन्यापासून मृत्यूचा सापळा बनत चालला असून दिवसेंदिवस होणाऱ्या अपघाताची संख्या आणि त्यामध्ये मृत्युमुखी पडणारांची संख्या शेकडोवर पोहोचली आहे. याबाबत लोकप्रतिनिधी जाणीवपूर्वक डोळे झाक करत असून सरकार केवळ दारूचे परवाने देऊन त्यामधून कर वसूल करण्यात व्यस्त आहे काय असा सवाल जनतेला पडला आहे.

गेल्या अनेक महिन्यापासून ची तेलगाव–माजलगाव रस्त्याच्या डांबरीकरणाची मागणी असताना सरकारमधील आमदार मंत्र्यांसह सर्वांनीच उदासीनता दाखवल्यामुळे माजलगाव तेलगाव रस्ता डांबरीकरण होऊ शकला नाही त्याचा परिणाम म्हणून दिवसे दिवस माजलगाव–तेलगाव रस्त्याच्या भेगा मोठ्या होत चालल्या असून त्याची रुंदी दोन ते अडीच फुटापर्यंत पोहोचली आहे आणि रस्ता मृत्यूचा सापळा बनत चालला आहे, यापूर्वी देखील या रस्त्याच्या मागणीसाठी शेतकरी कामगार पक्षाने आंदोलन करत पाठपुरावा केला परंतु शासनाने केवळ तात्पुरती डागडुजी करून वेळ मारून नेण्याचे काम केले, परंतु थोड्याच दिवसात हा रस्ता पुन्हा पूर्ववत झाला व मृत्यूचा सापळा बनत चालला असताना एक जून रोजी या रस्त्यावर पाच जणांचा मृत्यू झाला तरी देखील या रस्त्याकडे सरकार गांभीर्याने पाहायला तयार नसल्याने सरकारला अजून किती बळी घ्यायचेत हा प्रश्न जनतेला पडला असताना दि.०२जुन रोजी शेतकरी कामगार पक्षाचे नेते भाई ॲड. नारायण गोले पाटील यांच्यासह माजलगाव तालुक्यातील विविध संघटना व राजकीय पक्षाचे कार्यकर्ते यांनी उपविभागीय अधिकारी श्री गौरव इंगोले साहेब यांची भेट घेऊन सदरील रस्त्याचे तात्काळ डांबरीकरण करण्यात यावे अन्यथा दिनांक पाच जून रोजी सकाळी दहा वाजता परभणी चौक माजलगाव येथे रास्ता रोको आंदोलन करण्याचा इशारा निवेदनाद्वारे दिला आहे.

या निवेदनावर नुमान अलि चाऊस, नारायण तौर, सय्यद तोफिक लाला, सुलतान मन्सुरी, राजू कुरेशी, इनामदार ओमर, मोमीन बागवान, गुड्डू खलील, अलीम सय्यद, शोएब चाऊस, नविवोददीन सिद्दिकी, जुनेद आली, राजू कुरेशी जयपाल भिसे भाई मुंजा पांचाळ, अनंतराव जगताप, परमेश्वर डाके आदींच्या स्वाक्षऱ्या असून मुक्या व बहिऱ्या सरकारला जागे करण्यासाठी ५ जून रोजी माजलगाव येथे परभणी चौकात सकाळी दहा वाजता होत असलेल्या रास्ता रोको आंदोलनामध्ये हजारोंच्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन शेतकरी कामगार पक्षाचे नेते भाई ॲड नारायण गोले पाटील यांच्यासह इतरांनी केले आहे.

# शिवसैनिकांनो बॅनर नको, गरजवंतांना मदतीचा हात हीच माझ्यासाठी खरी शुभेच्छा : अनिलदादा जगताप

बीड । प्रतिनिधी



शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांचा वाढदिवस येत्या बुधवार, ४ जून रोजी असून प्रत्येक वर्षी हा दिवस जिल्हाभरातील शिवसैनिकांसाठी एक उत्सव असतो. निष्ठावंत शिवसैनिकांकडून अनिलदादांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून अनेक सामाजिक उपक्रम राबवले जातात, शहरभर बॅनर्स लावले जातात आणि हा दिवस जल्लोषात साजरा होतो. मात्र यंदा अनिलदादांनी आपल्या शिवसैनिकांना एक भावनिक आणि विचारप्रवृत्त करणारे आवाहन केलं आहे. त्यांनी आपल्या अधिकृत फेसबुक पेजवरून शिवसैनिकांना सांगितलं आहे की, माझा वाढदिवस बॅनरमुक्त करा. हे बॅनर लावण्यासाठी लागणारा खर्च लाखोंच्या घरात जातो. त्याऐवजी हा पैसा गरजूंवर खर्च करा. अनिलदादांचे हे आवाहन केवळ एक विनंती नसून समाजासाठी आपली जबाबदारी ओळखणाऱ्या नेत्याचे भावनिक मनोगत आहे. सध्या पावसाळ्याचे दिवस सुरु आहेत. अशा वेळी रस्त्यांवर भरपावसात भाजी विकणारे, कामावर जाताना मजूर, यांच्यासाठी रेनकोट किंवा छत्र्यांचे वाटप हा एक छोटा प्रयत्न असला, तरी त्यांना दिलासा देणारा हात ठरेल. माझा खरा वाढदिवस तेव्हाच साजरा होईल, जेव्हा गरिबांच्या चेहऱ्यावर तुमच्या मदतीमुळे हास्य उमटेल, असं सांगत अनिलदादांनी शिवसैनिकांना एक नवा विचार देत वाढदिवस गरजावंतांना मदतीचा हात द्या असे आवाहन केले आहे.

### सामाजिक उपक्रमांनी होणार अभिष्टचिंतन!

अनिलदादांच्या प्रेरणादायी आवाहनाला प्रतिसाद देत, जिल्हाभरातील शिवसैनिक अनिलदादांच्या वाढदिवसावर होणाऱ्या विविध खर्चातून सामाजिक उपक्रम राबवणार आहेत. अनेक ठिकाणी रेनकोट वाटप, अन्नदान, आरोग्य तपासणी आणि रक्तदान शिबिर तसेच विविध समजपयोगी उपक्रमांचे आयोजन शिवसैनिक करणार आहेत.

# तांबुळगाव येथील दवंडी भारतीय लोकशाहीची नवी दिशा ठरवणार? : एस.एम.युसूफ

बीड । प्रतिनिधी



तांबुळगाव येथे गेल्या अनेक वर्षांपासून भजन कीर्तनापासून पत्रकारितेपर्यंत आणि सामाजिक कार्यापासून राजकारणापर्यंत सदैव पुढे होऊन कर्तव्यरत असलेले ह.भ.प. शेषराव सोपणे मामा यांच्यासाठी तांबुळगाव या गावात देण्यात आलेली दवंडी ही आपल्या भारतीय लोकशाहीची नवी दिशा ठरवणार का? असा प्रश्न या निमित्ताने मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ यांनी उपस्थित केला आहे.

परभणी जिल्ह्याच्या पालम तालुक्यातील तांबुळगाव येथील ग्रामस्थांनी आदर्श निर्णय घेत ग्रामपंचायत बिनविरोध काढण्याबाबत एकमत करत तांबुळगावात जाहीर दवंडी दिली. तांबुळगाव गेल्या अनेक वर्षांपासून विकासापासून कोसो दूर राहीला आहे. या गावात आतापर्यंत अनेकांना संधी देण्यात आली परंतु प्रत्येक वेळी नवीन येणारा पदाधिकारी येरे माझ्या मागल्याप्रमाणे वागला. यामुळे हे गाव आजही अत्यंत मागास आहे. यामुळे अखेर विश्वरत्न भारतीय घटनेचे शिल्पकार, ज्ञानाचे महामेरू, डॉ. बाबासाहेब भिमराव आंबेडकर यांनी केलेले शिका, संघटीत व्हा व संघर्ष करा या वक्तव्याचे पालन करून तांबुळगाव येथील तरूणांनी हे ब्रीद सत्यात उतरविण्यासाठी वेळोवेळी गोरगरीब जनतेसाठी नेहमीच सडेतोड बोलून, आपली कणखर लेखणी चालवून न्याय देणारे, सर्वांचे विश्वासू व्यक्तीमत्व शेषराव सोपणे मामा यांना बिनविरोध सरपंच करण्यासाठी एकमत करत गावात शेषराव सोपणे मामा यांनाच बिनविरोध सरपंच करायचे अशी दवंडी देत जाहीर केले. अशाप्रकारे तांबुळगावात ह.भ.प. शेषराव सोपणे मामांसाठी देण्यात आलेली ही दवंडी भारतीय लोकशाहीची नवी दिशा ठरवणार का? असा प्रश्न या निमित्ताने मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ यांनी उपस्थित केला आहे.



स्थानिक गुन्हे शाखा बीड पोलीस निरीक्षक म्हणून पदभार स्वीकारल्याबद्दल पोलिस निरीक्षक श्री.शिवाजी बंटेवाड यांची भेट घेऊन पुढील कार्यासाठी शुभेच्छा देताना समाजसेवक साजिद शेख

# परळी शहरात पहिल्यांदाच महिला श्रामनेर शिबिर आयोजन : सीमाताई कांबळे

परळी । प्रतिनिधी



महामानव तथागत महात्मा गौतम बुद्ध यांच्या विचारसरणीवर आधारित बौद्ध धम्मा मध्ये अनेक महत्वपूर्ण विधी आहेत. त्यामध्ये सर्वात महत्त्वाचा व पहिला विधी श्रामनेर संस्कार विधी आहे. श्रामणेर झाल्याशिवाय बौद्ध होता येत नाही. बौद्ध धम्माचे संस्कार हे घरातील महिला, मुलींना व्हावेत हाच मूळ उद्देश लक्षात घेऊन परळी शहरात प्रथमच महिलां, मुलीसाठी श्रामनेर शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती बौद्ध उपासिका सीमाताई कांबळे यांनी एका पत्रकाद्वारे केली आहे.

परळी शहरातील, तालुक्यातील व जिल्ह्यातील जास्तीत जास्त महिला, मुलींनी या श्रामणेर शिबिरात सहभाग नोंदवावा असे आवाहन करण्यात येत आहे. श्रामनेर शिबिर परळी येथे जुलै महिन्यातील २० जुलै ते ३० तारखेला २०२५ मध्ये होणार आहे. श्रामनेर शिबिराचा कालावधी १० दिवसाचा असेल. या शिबिराचे उद्घाटन व प्रमुख पाहुणे म्हणून प्रा.डॉ.भंते सत्यपाल महाथेरो पाली विभाग प्रमुख मिलिंद कला महाविद्यालय नागसेनवन औरंगाबाद यांच्या प्रमुख उपस्थिती मध्ये संपन्न होणार आहे. श्रामणेर शिबिराचे स्थळ परळी तालुक्यातील असणार आहे. जास्तीत जास्त महिला, मुली यांनी श्रामनेर शिबिरात नाव नोंदणी करावी असे आवाहन धम्म उपासिका सीमाताई कांबळे परळी, यशोधरा महिला मंडळ अध्यक्ष मंगलताई किरवले सिरसाळा, गवळणबाई वाघमारे परळी, पंचशीला किरवले सिरसाळा यांनी केले आहे. नाव नोंदणीसाठी पुढील मोबाईलवर ८४५९०३८०८१, ९५११७५४०४८, ९९२२७९५०७०, ९३५६८७८९३० संपर्क करावा.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड–४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१–७–३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड–४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक – दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT